| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र. ०२/२०२२.**<br>**श्रीराम जगु आडे –वि.– शालिक जगु आडे व इतर**<br>**CNR No.- MHYA-1800-0024-2022.** |

## निशाणी क्र. ३४ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादीच्या वतीने यादीसोबत फेरफार क्र. ४७९, गट क्र. ४४/२ चे ७/१२ पत्रक, खाते क्र. १३ चा गाव नमुना ८अ व फेरफार क्र.३९१ च्या प्रमाणीत प्रती दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. प्रतिवादींच्या वतीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून सध्यस्थितीत वादीस सदर कागदपत्र दाखल करण्याचा अधिकार नसल्याचे नमुद करून आक्षेप नोंदविला आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करीता :–**

५. अभिलेखाचा विचार करता, दावा वाटणीकरीता तसेच मुनाफ्याचे चौकशी बाबत आदेश होवून मनाई हुकूम मिळणेबबात आहे. दावा मिळकती स्थावर मालमत्ता आहेत. नियोजीत कागदपत्र म्हणजेच महसुल उतारे दावा मिळकतींशी तसेच प्रकरणाशी संबंधीत आहेत. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे

अभिलेखावर असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे काही एक नुकसान होणार नाही. तथापी, उभय पक्षकारास पुरावा देण्याची संधी प्राप्त होऊन वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास वादीस नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जाऊन प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :–**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. त्यामुळे वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, दाव्याच्या प्राथमिक स्थितीत कोणाएका पक्षकारावर खर्च बसवणे योग्य व न्यायाचे नाही. सबब, न्यायाच्यादृष्टीने, मी पुढील आदेश करीत आहे;

## आदेश

१) वादीचा अर्ज निशाणी क्र. ३४ मंजूर करण्यात येतो.

२) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

(अ.अ. उत्पात)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
घाटंजी, जि. यवतमाळ.

दिनांक :– २७/०३/२०२३.